॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


*** सुविचार ***
दुसऱ्याच्या दुर्दैवात आनंद माणू नका.


■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. १५ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३५८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे अनिवार्य

● **मुंबई** – राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी तसेच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी.' वाहन मालकांनी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी आगाऊ वेळ निश्चित करावी. संबंधित वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### सोने आयातीवर आता मर्यादा

● **नवी दिल्ली** – सरकारने सोन्याच्या आयातीबाबत अधिक कठोर भूमिका घेतली आहे. सोन्याच्या आयातीसंदर्भातील नियमांमध्ये सरकारने पुन्हा एकदा सुधारणा केली असून आयात होणाऱ्या सोन्याच्या प्रमाणावर मर्यादा घातली आहे. देशातील वाढत्या सोन्याच्या आयातीला आळा घालण्यासाठी सरकारने अधिक कडक नियम केले आहेत. परकीय व्यापार महासंचालनालयाने आपल्या नियमांमध्ये किंचित बदल करुन ॲडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम अंतर्गत एका वेळी जास्तीत जास्त १०० किलोग्रॅम सोन्याच्या आयातीला परवानगी दिली. यापूर्वी यासाठी कोणतीही निश्चित मर्यादा नव्हती. त्यामुळे सोन्याच्या खरेदीवर आता मर्यादा आली. याआधी सोन्याच्या खरेदीवर कोणतीही मर्यादा नव्हती, आता बंधने असणार आहेत. ॲडव्हान्स ऑथोरायझेशन स्कीम अंतर्गत दागिन्यांच्या निर्यातदारांना सोने आणि इतर कच्चा माल शुल्कमुक्त आयात करण्याची परवानगी आहे. याचा उपयोग दागिने आणि निर्यातीसाठी इतर उत्पादने तयार करण्यासाठी केसला जातो. सरकारने आता या योजनेत अनेक नवीन अटी जोडल्या आहेत.

# नगर-पुणे महामार्गावर भीषण साखळी अपघात

## पळवे खुर्द शिवारात लक्झरी बस, कंटेनर, एसटी आणि कारची धडक । वऱ्हाडीसह ३५ जण जखमी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – नगर-पुणे महामार्गावरील पळवे खुर्द शिवारात गुरुवारी सकाळी भीषण साखळी अपघात झाला. हा अपघात लक्झरी बस, कंटेनर, एसटी बस आणि स्विफ्ट डिझायर कार यांच्यात झाला. या अपघातात आळंदी येथे विवाहासाठी निघालेल्या वऱ्हाडी मंडळींसह सुमारे ३० ते ३५ जण जखमी झाले. नशिब बलवत्तर म्हणुन किरकोळ जखमा वगळता सर्व प्रवाशी सुखरुप असल्याची माहिती आहे.

याबाबत समजलेली माहिती अशी की, पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील राजळे कुटुंबातील विवाह सोहळा गुरुवार दि. १४ रोजी आळंदी येथे होता. यानिमित्त सकाळी कासार पिंपळगाव येथून वऱ्हाडी घेवून लक्झरी बस नगर-पुणे महामार्गाने आळंदीच्या दिशेने जात होती. लक्झरी बस करंजी, नगर, सुपा मार्गे पळवे टोल नाका ओलांडून मठ वस्तीवरील घाणेगाव रोडलगत असलेल्या हॉटेल जय मल्हारसमोर जालना येथून पुण्याकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार (एमएच २० जीई १७८४) अचानक लक्झरी बसला कट मारत पुढे गेली.

मागून येणाऱ्या लक्झरी बस (क्रमांक एमएच १६ डीके ६०५१) च्या चालकाने कारला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि लक्झरी बस थेट रस्ता दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेने पुण्याहून नगरकडे येणाऱ्या कंटेनर (क्रमांक एचआर ३८, एडी ००६८) वर आदळली.



लक्झरी बस आणि कंटेनरच्या धडकेनंतर महामार्गावर अचानक वाहने थांबली. त्याचवेळी कंटेनरच्या मागून नगरकडे येणारी एसटी बसही वेगात येऊन कंटेनरला धडकली. या अपघातात एसटी बसमधील काही प्रवासी किरकोळ जखमी झाले. अपघाताला कारणीभूत ठरलेली स्विफ्ट डिझायर कार मात्र रस्त्यालगतच्या शेतामध्ये जाऊन थांबली.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, सुपा पोलिस आणि मदत पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. महामार्गावर तुटलेल्या काचा आणि वाहनांचे विखुरलेले अवशेष पाहून परिसर सुन्न झाला होता. जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी पाच रुग्णवाहिकांच्या सहाय्याने सुप्यातील निरामय हॉस्पिटल आणि दत्त हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, काही जखमींना डोक्याला तसेच हात-पायांना गंभीर दुखापती झाल्या असून त्यांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले.

या भीषण अपघातामुळे नगर-पुणे महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला हटवून वाहतूक सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले. जवळपास दोन तासांनंतर महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

लक्झरी बस आणि कंटेनरमधील धडक अत्यंत भीषण होती. या अपघातात दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा अक्षरशः चुराडा झाला. धडकेचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. लक्झरी बस आणि कंटेनरचे चालक वाहनांमध्ये अडकून पडले होते. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत क्रेनच्या सहाय्याने दोन्ही चालकांना बाहेर काढले. अपघातानंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला होता. मात्र नशिब बलवत्तर होते म्हणुन किरकोळ जखमा वगळता सर्व सुखरुप असल्याचे समजते. जखमींवर सुपा येथे प्राथमिक उपचार करुन नगर येथे हलविण्यात आले. तेथे किरकोळ जखमींवर उपचार करुन घरी सोडण्यात आले तर चार ते पाच जणांवर उपचार सुरु आहेत.

### जखमींच्या मदतीला धावले खासदार नीलेश लंके

■ अपघाताची माहिती मिळताच पारनेर येथे कार्यक्रमात व्यस्त असलेले खासदार निलेश लंके यांनी थेट सुप्यातील रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी जखमींची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. संबंधित डॉक्टरांशी चर्चा करून सर्व जखमींना तातडीने आणि योग्य उपचार मिळतील याची खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच जखमी वऱ्हाडी मंडळींच्या नातेवाईकांनाही धीर दिला.

## नगर शहरात ऑनलाईन 'बिंगो' जुगारावर छापा

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – शहरातील तपोवन रस्ता परिसरात सुरू असलेल्या ऑनलाईन जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे. इंडो आयरिश रूग्णालयासमोर एका पत्र्याच्या शेडमध्ये बिंगो नावाचा हार-जितीचा खेळ खेळला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या छाप्यात पोलिसांनी जुगार खेळणार्या आणि चालवणार्या सात जणांविरूध्द गुन्हा दाखल केला असून सुमारे एक लाख ९६ हजार १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अंमलदार आकाश काळे यांनी याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संतोष सुर्यभान तागड (रा. तागड वस्ती, पाईपलाईन रस्ता), संतोष भाऊसाहेब फणसे (रा. फणसेमळा, तपोवन रस्ता), ओंकार ठोंबरे (रा. पद्मानगर, सावेडी), विशाल आनंद (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही), राहुल अनिल फणसे, पुष्कर जगदीश पाषाण (दोघे रा. तपोवन रस्ता), कांचा ऊर्फ महावीर कमलाकर कोंडेकर (रा. गांधीनगर, बोल्हेगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. संतोष तागड हा ओंकार ठोंबरे याच्या सांगण्यावरून हा जुगार अड्डा चालवत होता.

पोलिसांनी छापा टाकला तेव्हा संतोष तागडसह संतोष फणसे, राहुल फणसे, पुष्कर पाषाण आणि कांचा उर्फ महावीर कोंडेकर हे जागीच जुगार खेळताना मिळून आले. या कारवाईत पोलिसांनी संगणक संच, इंटरनेट मोडेम, विविध कंपन्यांचे मोबाईल आणि रोख रक्कम जप्त केली आहे.

## लोकनियुक्त सरपंचाविरुध्द अविश्वास ठराव विशेष ग्रामसभेत मंजूर

● **शेवगाव । वीरभूमी** – तालुक्यातील सामनगाव ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंचाविरुध्द सदस्यांनी मांडलेला अविश्वास ठराव विशेष ग्रामसभेत मंजूर झाला. ग्रामसभेत राबवण्यात आलेल्या मतदान प्रक्रीयेत अविश्वास ठरावाच्या बाजूने २७४ मते, ठरावाच्या विरोधात २६ तर ३२ मते बाद झाली. विशेष ग्रामसभे लोकनियुक्त सरपंचाविरोधात अविश्वास ठराव मंजूर होण्याची नगर जिल्ह्यातील दुर्मिळ घटना आहे. दरम्यान, सामनगावच्या सरपंच यांचा अडीच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांच्या विरोधात अविश्वास मंजूर झाला आहे.

सामनगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच आदिनाथ कापरे व उपसरपंच प्रमोद कांबळे यांच्या विरोधात आठ सदस्यांनी कामकाज करतांना विश्वासात घेत नसल्याचे कारण दाखवून २२ एप्रिल रोजी तहसीलदार यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. त्यानंतर प्रशासनाने ३० एप्रिल रोजी ग्रामंपचायत कार्यालयात आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये आठ सदस्यांनी ठरावाच्या बाजुने मतदान केले. मात्र, सरपंचाची निवड थेट जनतेतून झालेली असल्याने विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या मतदानाव्दारे अविश्वास ठरावाची प्रक्रीया आज गुरुवार दि. १४ रोजी सामनगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पार पडली. त्यामध्ये प्रभाग निहाय मतदान प्रक्रीया राबवण्यात आली.

सकाळी ८.३० ते ११ यावेळी मतदानासाठी ३७० ग्रामस्थांनी नाव नोंदणी केली. तर ११ ते ४ या वेळेत प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. त्यामध्ये अविश्वास ठरावाच्या बाजूने २७४ मते, ठरावाच्या विरोधात २६ तर ३२ मते बाद झाली. तर नावनोंदणी केलेल्या ३० ग्रामस्थांनी मतदानाकडे पाठ फिरवली. या प्रक्रीयेदरम्यान तहसीलदार आकाश दहाडदे, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, विस्तार अधिकारी सचिन भाकरे भातकुडगाव, एरंडगाव, मुंगी, शेवगाव, चापडगाव येथील मंडलाधिकारी, तलाठी व ग्रामसेवक यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यात बाईक, चारचाकी वाहनांच्या मिरवणुकीस, सल्लागार नियुक्तीस बंदी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुलेटवरुन मंत्रालयात दाखल । अनेक मंत्र्यांनी वाहने वापरण्यास केले कमी

● **मुंबई । वीरभूमी** – पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात काटकसरीचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यात मंत्री, अधिका-यांच्या दौ-यावर निर्बंध आणतानाच सरकारने मोटारबाईक, चार चाकी वाहनांच्या मनमानी वापरावरही लगाम लावला आहे. तसेच सरकारी कार्यालयात सल्लागार नेमण्यासही निर्बंध आणण्यात आले आहेत. वैश्विक संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनानुसार राज्यातील महाविकास आघाडी सरकारनेही काटकसरीच्या धोरणाचा अंगीकार करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यापासून सुरुवात करत आज चक्क बाईकने प्रवास केला. सरकारप्रमाणेच राज्यातील जनतेलाही काटकसरीच्या धोरणाचा अंगीकार करावा असे आवाहन करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी याबाबत एक नियमावलीच जाहीर केली असून त्याचा अंमल करण्याचे आदेश सरकारी कार्यालयांना देण्यात आले आहेत.

परकीय चलनाचे संवर्धन करण्यासाठी शासकीय अधिका-यांनी अभ्यास/शासकीय कामाकरिता मंजूर असलेले परदेश दौरे रद्द करावेत व नवीन दौ-यांचे नियोजन करू नये.

दैनंदिन वापराकरिता बा स्त्रोताव्दारे घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रिक वाहने वापरण्यास प्राधान्य देण्यात यावे. कार्यालयीन कामानिमित्त नियोजित स्थळभेटी दरम्यान कमीत कमी वाहनांचा वापर करावा. अधिकाऱ्यांनी एकत्रित दौरा करताना कारपुलिंगव्दारे प्रवास करण्याचे नियोजन करावे. अधिकारी/कर्मचारी यांनी सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाजाकरिता दौरे आवश्यक असल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा.

वरिष्ठ अधिकारी यांनी आठवड्यातील एक दिवस मेट्रोने/लोकलने/सार्वजनिक बसने प्रवास करावा.

इलेक्ट्रिक वाहनांची चार्जिंग यंत्रणा सक्षम करणे व त्यासाठीचे लागणारे विजेचे दर कमी करण्याबाबत विचार करावा व चार्जिंग सेंटर उभारण्याकरिता प्रलंबित असलेल्या व नव्याने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना तातडीने मान्यता द्यावी.

मंत्रालयीन स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हा स्तरावरील शासकीय बैठका, प्रशिक्षण, सेमिनार इ. आयोजित करणे आवश्यक असल्यास व्हीसी प्रणालीचा वापर करण्यात यावा. सर्व बैठका, प्रशिक्षण, चर्चासत्रे इत्यादी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करावे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी याचे पालन सुनिश्चित करावे. पोलिस विभागाने कोणत्याही प्रयोजनाकरिता दुचाकी फे-या, वाहनांच्या मिरवणुका, वाहनांचा ताफा इ. साठी परवानगी देण्यात येऊ नये. माहिती व जनसंपर्क तसेच, कार्यन्वयन यंत्रणेने माफक प्रमाणात शासकीय जाहिराती प्रसारित कराव्यात आणि अनावश्यक खर्च टाळावा. खर्चिक तंत्रज्ञानाचा (डेकोरेटीव्ह लाईट्स इ.) वापर कमीत कमी करावा. फ्लेक्स, बॅनर यांचा कमीत कमी वापर करावा व प्रकाशित होर्डिंग्जसाठी डीजी सेटचा वापर करण्यात येऊ नये.

कार्यालयीन कामाकरिता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करून, अनावश्यक विद्युत दिव्यांचा वापर टाळावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, संगणक, वातानुकूलित यंत्रणा, उद्वाहन इ. उपकरणे बंद करावीत. तसेच, वातानुकूलित यंत्रणेचे तापमान २४-२६ अंशावर ठेवावे. 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवरती सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी भर देण्यात यावा. खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, अंगणवाडी, वसतिगृहे, तुरुंग, पोलिस भोजनालये, रुग्णालये यांनी त्यानुसार मेन्यूमध्ये बदल करावेत. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका यांनी घरांना खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी समुपदेशन करावे. पाम/सोयाबीन/सूर्यफूल तेलाऐवजी मोहरीचे तेल, शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन द्यावे.

# SPOT NEWS

## हिंगणगाव केंद्रात हर्षाली चेडे ९४ टक्के गुणांसह प्रथम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, ग्रामविकास विद्याप्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय, इसळक निंबळक येथील विद्यार्थिनी हर्षाली प्रदीप चेडे हिने ९४ टक्के गुण मिळवून हिंगणगाव केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे विद्यालयाचा आतापर्यंतचा विक्रम मोडला गेला आहे. हर्षाली ही वाहनचालक म्हणून कार्यरत असलेल्या प्रदीप कृष्णा चेडे आणि कोमल चेडे यांची कन्या असून, कृष्णा रामभाऊ चेडे यांची नात आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तिने मिळवलेले हे यश परिस्थिती कधीही यशाच्या आड येत नाही हे दाखवून देणारे ठरले आहे. तिच्या या यशामुळे शाळा आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यालयाचे सहसचिव अविनाश कोतकर, रावसाहेब म्हस्के सर आणि मुख्याध्यापिका संगीता जाजगे यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. या यशामध्ये वर्गशिक्षिका कोतकर शांता मॅडम यांच्यासह कोतकर मारुती सर, कोतकर विलास सर, चौधरी मॅडम, डोळस सर, गायकवाड सर, बाळासाहेब कोतकर सर, बांडे सर, होळकर सर आणि गीता डहाळे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभल्याचे हर्षालीने सांगितले.

## खरीप हंगामासाठी पीक प्रात्यक्षिक, प्रमाणित बियाणे व मिनिकिट वितरणसाठी अर्ज करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान - अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया अंतर्गत खरीप हंगाम २०२६ - २७ मध्ये कडधान्य, पौष्टिक तृणधान्य, भरडधान्य आदी पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पीक प्रात्यक्षिक, प्रमाणित बियाणे वितरण तसेच मिनिकिट वितरण या घटकांचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी व शेतकरी गटांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासनामार्फत ३१ मार्च २०२७ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्थांना अर्ज करता येणार आहेत. लाभार्थ्यांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार असून संबंधित गटांच्या अधिकृत सदस्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावर पीक प्रात्यक्षिक, प्रमाणित बियाणे वितरण तसेच कडधान्य पिकांचे मिनिकिट वितरण या घटकांसाठी शेतकरी व शेतकरी गट अर्ज करू शकतात. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांकडे तसेच लाभ घेणाऱ्या गटातील सदस्यांकडे फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने सन २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले असल्यामुळे या योजनांमध्ये महिला शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यात येणार आहे.

# इंधन बचतीसाठी पालकमंत्र्यांचा आदर्श निर्णय

### डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासकीय ताफ्यात केली मोठी कपात । आता केवळ दोनच वाहनांचा वापर

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

देशभरात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि अनावश्यक शासकीय खर्च कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशाची व्यापक चर्चा सुरू असतानाच अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शासकीय ताफ्यातील अनावश्यक वाहनांची संख्या कमी करत त्यांनी आता आपल्या ताफ्यात केवळ दोनच वाहने ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, सामान्य नागरिकांकडूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करावी, असा संदेश या निर्णयातून दिला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

सध्या देशभरात इंधन वापर कमी करणे, पर्यावरण संवर्धन आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत मोठे वाहन ताफे, अतिरिक्त वाहनांचा वापर आणि वाढता शासकीय खर्च यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. त्याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



विशेष म्हणजे, राजकीय पदाधिकाऱ्यांचे मोठे ताफे, त्यासाठी होणारा इंधन खर्च आणि प्रशासनावर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार याबाबत सामान्य नागरिकांमध्ये अनेकदा नाराजी व्यक्त होत असते. मात्र, विखे पाटील यांनी स्वतः हून पुढाकार घेत ताफ्यात कपात केल्याने साधेपणा आणि जबाबदारीचे उदाहरण समोर आले आहे.

पर्यावरणपूरक जीवनशैली, इंधन बचत आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर या तिन्ही बाबींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून स्पष्टपणे दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेला केवळ संदेश देऊन न थांबता स्वतःच्या कृतीतून आदर्श निर्माण करणेही तितकेच आवश्यक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राज्यातील इतर लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणांनीही खर्चात बचत करण्यासाठी अशाच प्रकारे पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. इंधन बचतीसह पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा निर्णय सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

## सेनापती बापट विद्यालयाच्या समृद्धी रोडे हिची नवोदय विद्यालयात निवड

**● पारनेर । वीरभूमी–**

सेनापती बापट माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यालयाची विद्यार्थिनी समृद्धी गणेश रोडे हिची जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे इयत्ता ११ वी प्रवेशासाठी निवड झाली आहे. अत्यंत चुरशीच्या आणि स्पर्धात्मक परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल समृद्धीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर यांच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात 'लॅटरल एन्ट्री सिलेक्शन टेस्ट' घेण्यात आली होती. इयत्ता ११ वीमधील रिक्त जागा भरण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेसाठी अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

ही परीक्षा पूर्णपणे वस्तुनिष्ठ स्वरूपाची असून, त्यामध्ये गणित, विज्ञान, इंग्रजी आणि समाजशास्त्र या विषयांवर आधारित कठीण प्रश्न विचारले जातात. संपूर्ण जिल्ह्यातून अत्यंत मोजक्या विद्यार्थ्यांची निवड केली जाते. अशा स्पर्धात्मक वातावरणात समृद्धीने आपल्या बुद्धिमत्तेची आणि परिश्रमाची चुणूक दाखवत नवोदय विद्यालयातील प्रवेश निश्चित केला आहे.

समृद्धीच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून, चिकाटी, सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर केंद्रीय विद्यालयात प्रवेश मिळवणे शक्य असल्याचे तिने सिद्ध करून दाखवले आहे.

समृद्धीच्या या दैदीप्यमान यशाबद्दल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, शाळा समितीचे चेअरमन अनिल भंडारी, को-चेअरमन विलास कटारिया तसेच सर्व शाळा समिती सदस्यांनी तिचे विशेष कौतुक केले आहे.

## श्री लक्ष्मीनृसिंह प्रतिष्ठानतर्फे पाथर्डीतील गुणवंतांचा सन्मान

### विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव

**● पाथर्डी । वीरभूमी–**



पार्थनगरीतील प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे सर्वस्व देऊन कार्य करणारी माणसं हीच खऱ्या अर्थाने पाथर्डीची ओळख आणि अभिमान आहेत. शिक्षण, संस्कार, संयम आणि संवाद यांच्या माध्यमातूनच समाज व राष्ट्रनिर्मिती सक्षमपणे घडू शकते, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांनी केले.

श्री लक्ष्मीनृसिंह प्रतिष्ठान आणि दहावी १९९० बॅचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पार्थनगरीतील गुणवंतांचा सन्मान' कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात पाथर्डीचे सुपुत्र आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आयएफएस परीक्षेत नुकतेच यश संपादन करणारे अक्षय पवार, सरपंच परिषदेचा 'उत्तम प्रशासक पुरस्कार' विजेते अशोक खेडकर, पीएसआयपदी निवड झालेले सचिन खेडकर, ऊसतोड कामगारांच्या आरोग्य क्षेत्रात सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्र भूषण डॉ. ज्ञानेश्वर दराडे, आंतरराष्ट्रीय स्तरावर छायाचित्रांना मानांकन मिळवणारे डॉ. दीपक जायभाये, संगीत अलंकार तसेच सुप्रसिद्ध दंतशल्यचिकित्सक डॉ. हृषिकेश कुलकर्णी, करोडीच्या आदर्श सरपंच डॉ. सौ. सुमन खेडकर तसेच शेवगाव येथील रेसिडेन्शिअल विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब गायकवाड आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

तसेच केंद्रप्रमुख उपक्रमशील शिक्षक नामदेव धायतडक, रामदास आव्हाड, सौ. सविता कुटे-आव्हाड, सुभाष सोनवणे, आदर्श शिक्षक शहादेव काळे, उपक्रमशील शिक्षिका सौ. अलका ढाकणे, पत्रकार शन्नो पठाण, प्रशांत सोनवणे, अक्षय वायकर, संदीप शेवाळे आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमामध्ये आयएफएस परीक्षेत देशात ८१ वा क्रमांक मिळवणारे अक्षय पवार यांच्याशी उपस्थितांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे देत स्पर्धा परीक्षा, अभ्यास नियोजन आणि व्यक्तिमत्त्व विकासाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लक्ष्मीनृसिंह प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. श्रीधर देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन शिवव्याख्याते सचिन नागपुरे यांनी केले, तर स्वागत प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. सौ. ज्योती देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन अजय गरड यांनी मानले.

# मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण जाहीर

### मतदारांनी आवश्यक ते सहकार्य करावे : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनावर आधारित मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमास सर्व राजकीय पक्ष तसेच मतदारांनी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

या कार्यक्रमानुसार ३० जून २०२६ ते २९ जूलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेट देऊन प्रगणना फॉर्म वाटप करणार आहेत. हे फॉर्म प्रत्येक मतदाराला दोन प्रतीत दिले जातील. मतदारांनी दोन्ही फॉर्म पूर्णपणे भरून अधिकाऱ्याकडे जमा करावेत व एका प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. प्रगणना फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरून देण्याचीही सुविधा उपलब्ध असणार आहे. मतदारांचे सन २००२ च्या मतदारयादीशी मॅपिंग झाले असले तरीही सर्वांनी फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. फॉर्म भरून न दिलेल्या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट होणार नाहीत.

ज्या मतदारांचे प्रगणना फॉर्म प्राप्त होतील त्यांची प्रारूप मतदार यादी ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ५ ऑगस्ट २०२६ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत यादीबाबत काही हरकती व दावे असल्यास नियमानुसार दाखल करता येतील. तसेच ५ ऑगस्ट २०२६ ते ३ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट असणारे परंतु २००२ च्या यादीशी मॅपिंग न झालेले किंवा अचूक मॅपिंग न झालेले मतदार यांची मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून सुनावणी घेतली जाईल. सुनावणीवेळी मतदारांनी आपला रहिवास व जन्माचा पुरावा दाखल केल्यावर त्यांची नावे अंतिम यादीत समाविष्ट होतील.

प्रारूप मतदार यादीवर दाखल झालेले हरकती व दावे निर्गत करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने १४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित प्रतिनिधींना कार्यक्रमाची सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. सर्व राजकीय पक्षांनी प्रत्येक यादी भागाकरिता एक मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले असून नियुक्त प्रतिनिधींना मतदार नोंदणी अधिकारी स्तरावर प्रशिक्षण दिले जाईल.

## धर्मवीर संभाजीराजे जयंतीनिमित्त छावा संघटनेचा सामाजिक उपक्रम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. निमगाव वाघा येथील नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेला किराणा साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला.

धर्मवीर संभाजीराजे यांच्या विचारांप्रमाणे समाजहिताची भावना जोपासत जयंती उत्सव साजरा व्हावा, या उद्देशाने छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी हा उपक्रम हाती घेतला. संस्थेतील विद्यार्थ्यांना दैनंदिन उपयोगाचे किराणा साहित्य देत सामाजिक जाणिवेचा आदर्श निर्माण करण्यात आला.

यावेळी छावा संघटनेचे युवक आघाडी सचिव पश्चिम महाराष्ट्र दत्ता भाऊ वामन, जिल्हाध्यक्ष सुरेखाताई सांगळे पाटील, बापू ठाणगे, दीपक गहिले, पिंटू पवार, दिलीप गायकवाड, रविकिरण वाघ, मयुर पवार, माधवी दांगट, प्रियंका म्हस्के, अनुराधा सुरर्से, मनिषा भोसले, शामल शिंदे, ज्योती शिंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना दत्ताभाऊ वामन म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त होणाऱ्या अनावश्यक व दिखाऊ खर्चाला फाटा देत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणे हीच खरी जयंती साजरी करण्याची भावना व्यक्त करून सामाजिक कार्यातून युवकांनी प्रेरणा घ्यावी अशी भावना व्यक्त केली तर बापू ठाणगे यांनी आभार मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## भारतीय सशस्त्र दलातील अधिकारी पदांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी इच्छुक उमेदवारांना सुवर्णसंधी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे नवयुवक – नवयुवतींसाठी दि. १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६७ चे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासोबतच मोफत निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे दिनांक ०८ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभागाच्या (डीएसडब्ल्यू) अधिकृत संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना व प्रवेशपत्र डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक असून संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज केलेला असावा. याबाबत अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांच्याशी training.pctcnashikgmail.com या ई–मेलवर किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५३–२४५१०३२ तसेच व्हॉट्सप क्रमांक ९१५६०७३३०६ वर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## रयत शिक्षण संस्थेत उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

आशिया खंडातील सर्वात मोठ्या रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय मंत्री मा. शरद पवार यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आल्याचे व उत्तर विभागाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे उत्तर विभागीय कार्यालय व माध्यमिक शिक्षक संघाकडून स्वागत करण्यात आले आहे. तर उत्तर विभागाला विशेष प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. शिक्षणाची गंगा बहुजनांच्या घराघरात पोहोचविणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी अरूण पुंजाजी कडू–पाटील आणि सचिवपदी विकास विश्वासराव देशमुख यांची फेरनिवड करण्यात आली आहे. यासोबतच रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातून मॅनेजिंग कौन्सिल सदस्य म्हणून ॲड. भगीरथ निवृत्ती शिंदे, श्रीमती मीनाताई माणिकराव जगधने, बाबासाहेब सहादू भोस, संदिप गोरखनाथ वर्पे, सुरेश विठ्ठलराव बोळीज, प्रिं. डॉ. नानासाहेब सूर्यभान गायकवाड, राजेंद्र खंडेराव चांदे यांची निवड झाली आहे. ना. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नूतन पदाधिकाऱ्यांच्या कार्यकुशलतेमुळे संस्थेची शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक प्रगती अधिक वेगाने होईल, अशी भावना विभागीय अध्यक्ष आशुतोष काळे व विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे यांनी व्यक्त केली आहे. या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी नूतन कार्यकारिणीचे विशेष अभिनंदन केले आहे. उत्तर विभागातील सर्व जनरल बॉडी सदस्य, लाइफ वर्कर, लाइफ मेंबर, सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि रयत हितचिंतकांनी या निवडीचे स्वागत करून नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिर्डीत २३ मे रोजी संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन

### राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत निबे ग्रुपच्या डिफेन्स क्लस्टरचा शुभारंभ । तीन हजार रोजगार निर्मितीची अपेक्षा

**शिर्डी । वीरभूमी –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' या दूरदर्शी संकल्पनांना चालना देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी औद्योगिक वसाहतीमध्ये उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते दि. २३ मे २०२६ रोजी होणार असल्याची माहिती जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि निबे ग्रुपचे प्रमुख गणेश निबे यांनी दिली.



यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले की, निबे ग्रुपच्या माध्यमातून शिर्डीत उभारण्यात येणारे डिफेन्स क्लस्टर हे भारतातील खासगी क्षेत्रातील संरक्षण उत्पादनाच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. अत्यावश्यक संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रांसाठी प्रगत उत्पादन क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

ते पुढे म्हणाले की, शिर्डीची भूमी ही भक्ती आणि शक्तीचा अद्वितीय संगम आहे. श्री साईबाबांचा श्रद्धा आणि सबुरीचा संदेश एका बाजूला असून, दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्हा संरक्षण उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत आहे.

या प्रकल्पामुळे सुमारे तीन हजार रोजगारांची निर्मिती होणार असल्याचे सांगून, शिर्डीसाठी या प्रकल्पाची निवड केल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

निबे उद्योग समूहाचे प्रमुख गणेश निबे यांनी प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे आमच्या स्टार्टअपला मोठी संधी मिळाली आहे. शिर्डी येथील प्रकल्पात आतापर्यंत एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून, भविष्यात ही गुंतवणूक आणखी वाढविण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले की, अत्याधुनिक प्रणालींचे डिझाइन, विकास, उत्पादन आणि एकत्रीकरण करणारा निबे ग्रुप हा देशातील आघाडीचा उद्योग समूह असून, शिर्डीतील प्रकल्पामध्ये बॉम्ब शेल उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन तसेच बायो–सीएनजी प्रकल्पाचे भूमिपूजन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

शिर्डी येथील हा प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, लघु व सूक्ष्म उद्योगांचे सक्षमीकरण, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणीय जबाबदारी या सर्वांचा समन्वय साधणाऱ्या एकात्मिक दृष्टिकोनातून कार्यान्वित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त देशभरातील विद्यार्थी, उदयोन्मुख अभियंते तसेच लघु व सूक्ष्म उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना निमंत्रित करण्यात आल्याची माहितीही गणेश निबे यांनी दिली.

## प्रा. डॉ. धनंजय मंडलिक यांची पुणे विद्यापीठाच्या अधिष्ठातापदी निवड

**अकोले । वीरभूमी–**



तालुक्यातील उंचखडक येथील सुपुत्र आणि अगस्ती महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. धनंजय मंडलिक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या अधिष्ठाता (डिन) पदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे अकोले तालुक्यासह शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव, अभ्यासू वृत्ती आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन यामुळे डॉ. मंडलिक यांनी शिक्षण क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निवडीमुळे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेला नवी दिशा आणि बळ मिळेल, असा विश्वास शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

डॉ. मंडलिक यांचे प्राथमिक शिक्षण उंचखडक बुद्रुक (ता. अकोले) येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. अत्यंत साध्या कुटुंबातून त्यांनी शिक्षणाचा प्रवास पूर्ण केला. त्यांचे वडील अशिक्षित असून शेती व्यवसाय करीत होते.

अगस्ती महाविद्यालय, अकोले येथून त्यांनी बी.एस्सी. (फिजिक्स) पदवी संपादन केली. त्यानंतर नाशिक येथे एम.सी.एम. शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी शिरूर येथील रसिकलाल धरिवाल कॉलेजमध्ये पाच वर्षे प्राध्यापक म्हणून कार्य केले. सध्या ते सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये कार्यरत आहेत.

डॉ. मंडलिक यांनी यापूर्वी विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. संशोधन, गुणवत्ता वृद्धी आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांवर त्यांनी सातत्याने भर दिला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## चापडगाव हायस्कूलचा दहावीचा निकाल ८२.९० टक्के

### संस्कृती खाडे हिचा प्रथम क्रमांक । गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**शेवगाव । वीरभूमी–**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव हायस्कूल, चापडगाव विद्यालयाचा निकाल ८२.९० टक्के लागला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये विद्यालयातून एकूण २३४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १९४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीतही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सेमी माध्यमातून कु. संस्कृती कृष्णा खाडे हिने ९१.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. चि. साई गोरख गोर्डे यांनी ९०.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. अश्विनी वैजनाथ बटुळे हिने ८९.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

मराठी माध्यमामध्ये कु. सेजल अनिल शिरसाठ हिने ६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. चि. महेश अंबादास बनकर यांनी ५८ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. आरती राजू साळुंखे हिने ५७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यालयात उत्साहात पार पडला. विद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना फाईल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

यंदा प्रथमच राबविण्यात आलेल्या कॉपीमुक्त अभियानातही विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश उल्लेखनीय असल्याचे प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण यांनी सांगितले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंहभैय्या काकडे, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, कांतेश्वर ढोले, प्राचार्य अरुण वावरे, प्रभारी प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक अनिल मगर, अशोक आघवणे, दादासाहेब ज्योतीक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच पालकवर्ग यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय दुधाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय मरकड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# गौतम पब्लिक स्कूलमध्ये ५७ महाराष्ट्र बटालियनचा एनसीसी ट्रेनिंग कॅम्प

### ४०२ एनसीसी विद्यार्थ्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण । आपत्कालीन परिस्थितीसाठी घडविण्यावर भर

**कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पब्लिक स्कूलमध्ये केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने 'सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प' उत्साहात पार पडत आहे. कॅम्पमधील विद्यार्थ्यांसाठी संस्थेचे विश्वस्त आमदार आशुतोष काळे आणि सचिव सौ. चैतालीताई काळे यांच्या सूचनेनुसार सर्व प्रकारच्या सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली.

सोमवार (दि. ११) पासून सुरू झालेल्या या प्रशिक्षण शिबिराची सांगता बुधवार (दि. २०) रोजी होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील २८ शाळांमधील इयत्ता ८ वी व ९ वीचे विद्यार्थी तसेच १५ महाविद्यालयांतील इयत्ता ११ वी, १२ वी आणि वरिष्ठ महाविद्यालयीन एनसीसी कॅडेट्स अशा एकूण ४०२ विद्यार्थ्यांचा या वार्षिक प्रशिक्षण शिबिरात सहभाग आहे. यामध्ये २६२ मुले आणि १४० मुलींचा समावेश असून गौतम पब्लिक स्कूलच्या २१ विद्यार्थ्यांचाही सहभाग आहे.

या विद्यार्थ्यांना कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना, डेप्युटी कॅम्प कमांडर कॅप्टन अंकुश आवारे आणि कॅम्प सुभेदार मेजर राजेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जात आहे.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना व्यायाम, परेड, रायफल हाताळणी, नकाशा वाचन, जर्निंग डिस्टन्स, फिल्ड क्राफ्ट, हेल्थ अँड हायजीन आदी विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच सेंट्रल लेक्चरद्वारे आगीपासून बचाव, वन विभागामार्फत जंगलातील प्राण्यांची ओळख आणि प्राण्यांच्या हल्ल्यात प्राथमिक उपचार, तसेच परिवहन विभागाकडून आपत्कालीन वाहतूक नियम व वाहन चालविण्याचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

देशात किंवा राज्यात अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थिती अथवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांची सुरक्षा आणि बचाव कार्यासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनामार्फत या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना यांनी दिली.

एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशसेवेची भावना, कर्तव्यदक्षता आणि जागरूकता निर्माण केली जाते. कोणत्याही परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे आणि संकटांवर मात करण्याचा आत्मविश्वास या प्रशिक्षण शिबिरातून विद्यार्थ्यांना दिला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून, भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत या प्रशिक्षित विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. घरापासून आणि मोबाईलच्या आभासी विश्वापासून दूर राहून सर्वसामान्य नागरिकांमध्ये



समरस होण्याचे धडेही विद्यार्थ्यांना या शिबिरातून दिले जात आहेत. त्यामुळे गौतम पब्लिक स्कूलचे मैदान सध्या एका सैन्य छावणीचे स्वरूप धारण करत आहे. या प्रशिक्षण शिबिराला संस्थेचे विश्वस्त आमदार आशुतोष काळे आणि सचिव सौ. चैतालीताई काळे भेट देणार असल्याची माहिती देण्यात आली. प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली गौतम स्कूलचे एनसीसी सीटीओ ईसाक सय्यद हे 'सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प' यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# वारकऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोर नियोजन करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । आषाढी वारी नियोजनाबाबत आढावा बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** पांडुरंगाच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह परजिल्ह्यातील अनेक दिंड्या आषाढी वारीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या दिंड्यांतील वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, वीजपुरवठा, मुक्कामाची व्यवस्था, फिरती स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा तसेच सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आषाढी वारी – २०२६ नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, संत निळोबाराय पालखीचे अध्यक्ष अशोकराव सावंत, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग, देवीदास महाराज म्हस्के, मानाच्या पालख्यांचे प्रमुख, विविध दिंडी प्रमुख तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. हजारो वारकरी पायी प्रवास करत असतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेसह सर्व मूलभूत सुविधांची प्रभावी व्यवस्था करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. ज्या गावांमध्ये अथवा शहरांमध्ये दिंड्यांचा मुक्काम होणार आहे, त्या ठिकाणी वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले.

दिंडी मार्गावर वारकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, निवास व्यवस्था आणि वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने समन्वयाने कार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच मुक्कामाच्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात यावेत. आवश्यकतेनुसार जिल्हा परिषदेच्या शाळांमधील खोल्याही उपलब्ध करून देण्यात याव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी तसेच महत्त्वाच्या ठिकाणी आरोग्य पथके तैनात ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक औषधसाठा, मनुष्यबळ आणि रुग्णवाहिका उपलब्ध ठेवून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार मिळतील, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच दिंडीदरम्यान पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता नियमित तपासण्याबरोबरच मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक इंधन व्यवस्थाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



आषाढी वारीदरम्यान प्रभावी समन्वय राखण्यासाठी सर्व विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांची संपर्क सूची तयार करण्यात यावी. संबंधित अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक नमूद करून तातडीच्या समन्वयासाठी व्हॉट्सप समूह तयार करावा. तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावर हेल्पलाईन क्रमांक सुरू करून त्याची माहिती प्रत्येक दिंडीपर्यंत पोहोचवावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी दिंडी मार्गावरील वाहतुकीचे प्रभावी नियमन करण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. मुक्कामाच्या ठिकाणीही पोलीस कर्मचारी नियुक्त करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यावर भर देण्यात आला. तसेच दिंडी मार्गावरील रस्त्यांची डागडुजी, खड्डे भरणे आणि आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या.

यावेळी संत निळोबाराय पालखीचे अध्यक्ष अशोकराव सावंत तसेच विविध दिंडी प्रमुखांनी गतवर्षी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. फिरती स्वच्छतागृहे, इंधन व्यवस्था, आरोग्य सेवा, मंडप व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, टँकरद्वारे पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि रेनकोट यांसह विविध सुविधांबाबत मागण्या आणि सूचना यावेळी मांडण्यात आल्या.

बैठकीत जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ यांनी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती पॉवरपॉईंट सादरीकरणाद्वारे दिली.

बैठकीस सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, पालखी प्रमुख आणि दिंडी प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे इंटरनॅशनल चेस स्पर्धेत पाथर्डीच्या खेळाडूंची चमक

## ओवी मिरड व सृष्टी बोरुडे यांना आंतरराष्ट्रीय मानांकन । राज्यस्तरीय निवड चाचणीतही उल्लेखनीय यश

**● पाथर्डी । वीरभूमी–** नुकत्याच पुणे येथे पार पडलेल्या पुणे इंटरनॅशनल चेस रॅपिड टेस्ट या प्रतिष्ठित बुद्धिबळ स्पर्धेत पाथर्डीतील युवा बुद्धिबळपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत ओवी राजू मिरड आणि सृष्टी दीपक बोरुडे यांनी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मानांकन प्राप्त करत मोठे यश संपादन केले.



यामध्ये ओवी मिरड हिने अवघ्या सात वर्षे, अकरा महिने आणि एकोणतीस दिवसांच्या वयात जलद बुद्धिबळ प्रकारात १४६६ आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवत अहिल्यानगर जिल्ह्यातील मानांकन प्राप्त करणारी सर्वात लहान खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाचे सर्व स्तरांतून विशेष कौतुक होत आहे.

तसेच सृष्टी दीपक बोरुडे हिनेही वयाच्या तेराव्या वर्षी जलद बुद्धिबळ प्रकारात १५७० आंतरराष्ट्रीय मानांकन मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अल्पवयात मिळवलेल्या या यशामुळे दोन्ही खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, मागील आठवड्यात अहिल्यानगर येथे अहिल्यानगर बुद्धिबळ संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सात, नऊ, तेरा आणि एकोणीस वर्षांखालील मुला-मुलींसाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत जिल्हाभरातील अनेक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. प्रत्येक गटातील प्रथम दोन मुले व मुलींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार होती.

या स्पर्धेतही पाथर्डीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत विविध गटांमध्ये बाजी मारली. सात वर्षांखालील गटात विहान नाईक याने प्रथम क्रमांक पटकावला, तर नऊ वर्षांखालील गटात ओवी मिरड हिने द्वितीय क्रमांक मिळवला. तेरा वर्षांखालील गटात सृष्टी बोरुडे हिने प्रथम क्रमांक मिळवला असून मनस्वी मरकड हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच एकोणीस वर्षांखालील गटात यशदा राठोड हिने प्रथम क्रमांक, तर दिपाली क्षिरसागर हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

या सर्व यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक सचिन कांबळे आणि आदेश देखने यांच्या आनंद चेस क्लबचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रशिक्षणामुळेच खेळाडूंनी सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी केल्याची भावना पालक व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली.

पाथर्डीतील या युवा बुद्धिबळपटूंच्या उल्लेखनीय यशामुळे तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, खेळाडू आणि प्रशिक्षकांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मोफत पूर्वतयारी प्रशिक्षण

## ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीच्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने महाज्योतीमार्फत जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी २०२६-२८ बॅचसाठी मोफत ऑनलाइन पूर्वतयारी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

महाज्योतीमार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार असून टॅबही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.संबंधित विद्यार्थी इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावा.विद्यार्थी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. तसेच विद्यार्थ्याने विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थी हा नॉन क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा. विद्यार्थ्यांची निवड इयत्ता दहावीतील गुणांची टक्केवारी, सामाजिक प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणानुसार करण्यात येणार आहे.

अर्ज करण्यासाठी आधार कार्ड, रहिवासी दाखला, जातीचे प्रमाणपत्र, वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, इयत्ता दहावीची गुणपत्रिका, दिव्यांग असल्यास संबंधित प्रमाणपत्र तसेच अनाथ असल्यास त्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत.

अर्जासोबत सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकित करून स्पष्ट दिसतील अशा पद्धतीने स्कॅन करून जोडावीत, असेही कळविण्यात आले आहे.

महाज्योती — ज्ञानदीप समतेचा —

# समाजकार्यात सामाजिक जाणीव आवश्यक

## महंत उद्धव महाराज मंडलिक । सोनई येथे आनंदवन संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त 'पसायदान' पुरस्कारांचे वितरण

**● नेवासा । वीरभूमी–** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी कुठलाही हातचा राखून न ठेवता संपूर्ण जगासाठी 'पसायदान' मागितले. त्यामुळेच त्यांना आईस्वरूप 'माऊली' म्हणून ओळख मिळाली. आज समाजात गरीब-श्रीमंत यांच्यात मोठी दरी निर्माण होत असून सामाजिक भान हरपत चालले आहे. ग्रंथांचा व चारित्र्याचा बोध घेणे शक्य नसेल, तरी माऊलींचे 'पसायदान' समजून घेत माणुसकीचा धर्म पाळला गेला पाहिजे. आपल्या प्रत्येक कामातून सामाजिक जाणीव दिसली पाहिजे, असे प्रतिपादन वारकरी संप्रदायातील अभ्यासक महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.




सोनई येथील आनंदवन संस्थेतर्फे वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या 'पसायदान' पुरस्कारांचे वितरण मंगळवारी (ता. १२) करण्यात आले. यावेळी महिला बचत गट चळवळीच्या मार्गदर्शिका व पंचायत समितीच्या माजी सभापती सुनीताताई गडाख, ओमशांती केंद्राच्या प्रमुख उषादिदी, सिद्ध समाधी योग परिवाराच्या डॉ. हेमा वैरागर, संत निरंकारी मंडळाचे विठ्ठल महाराज खाडे, सुनीता महाराज कुसळकर, अशोक महाराज नरवडे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी बाफणा, डॉ. बाबासाहेब शिरसाठ, सोनई महाविद्यालयाचे प्राचार्य गोरक्षनाथ कल्हापूरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महंत उद्धव महाराज मंडलिक म्हणाले, आयुष्यात चांगल्या कामातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करता येते. त्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक आहे. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी जगाला शांततेचा संदेश देताना संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा विचार केला. आपल्या कामातून इतरांचा आदर राखत त्यांना प्रोत्साहन मिळेल, अशा विचाराने पुढे जाणे आवश्यक आहे.

आनंदवन संस्थेने सामाजिक जबाबदारी स्वीकारून राज्यभर विविध उपक्रम राबविले असल्याचे संस्थेचे सचिव संजय गर्जे यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष उदय पालवे, उपाध्यक्ष विनायक दरंदले, किशोर घावटे, अरुण घावटे, कृष्णा सुद्रिक, ज्येष्ठ पत्रकार सुखदेव फुलारी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल जाधव यांनी केले, तर डॉ. तुषार दराडे यांनी आभार मानले.

### पुरस्काराने विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव

■ सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या आनंदवन संस्थेतर्फे 'पसायदान' पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये पंढरीनाथ महाराज तांदळे (आध्यात्मिक), सामाजिक कार्यकर्ते शिवाजीराव कपाळे (सहकार), डॉ. संजय सोनवणे (आरोग्य व सामाजिक कार्य), आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक प्रकाश बडजाते (कार्यगौरव) आणि ॲग्रोवनचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी तसेच मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके यांना जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष स्व. सोपानराव दरंदले स्मृती 'पसायदान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय डॉ. देवयानी ससाणे, ओंकार दरंदले आणि प्रसाद महाराज तरवडे यांचाही गौरव करण्यात आला.